# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः10.04.2025** **वारःगुरुवार**

---

१.भारतीय रिझर्व्ह बँकेकडून रेपो दरात कपात

२.नवकार महामंत्र विकसित भारताच्या संकल्पनेशी निगडीत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन

३.आरोग्य उपकेंद्र ते संदर्भ सेवा रुग्णालयांपर्यंत विविध आरोग्य संस्था बळकट करण्यासाठी विस्तृत प्रकल्प तयार करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

४.रत्नागिरी गुंतवणूक परिषदेत स्थानिक उद्योजकांकडून १ हजार ३७ कोटी रुपयांचे गुंतवणूक करार

आणि

५.सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या वेताळ बांबर्डे गावात लोकसहभागातून जलक्रांती

<u>केंद्रियमंत्रीमंडळ-पूल-सुरेखा</u>

केंद्रिय मंत्रीमंडळानं प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेची उप योजना म्हणून कमांड क्षेत्र विकास आणि जल व्यवस्थापन योजनेचं आधुनिकीकरण करण्याला मंजूरी दिली आहे. केंद्रिय मंत्रीमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत ही मंजूरी दिल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बातमीदारांना सांगितलं. या योजनेअंतर्गत सिंचनासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या कालव्यांमधून अधिक क्षमतेनं पाणीपुरवठा करता यावा यासाठी त्यात सुधारणा करण्यात येणार आहेत.

या निर्णयामुळे सूक्ष्म सिंचनाला चालना मिळेल आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याला प्रोत्साहन मिळेल. पाण्याच्या कार्यक्षम वापरामुळे कृषी उत्पादकता वाढून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे.

<u>आरबीआय</u>

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीनं सलग दुसऱ्या वेळी रेपो दरात कपात केली आहे. त्यामुळे आता रेपो दर ६ टक्क्यांवर आला आहे. तसंच एसडीएफ दर ५ पूर्णांक ७५ शतांश टक्के आणि एमएसएफ दर ६ पूर्णांक २५ शतांश टक्के करण्यात आला आहे.

सोन्याच्या दरवाढीमुळे किरकोळ महागाई दरात मात्र वाढ होऊन तो ४ पूर्णांक १ दशांश टक्के झाल्याचं आरबीआयनं म्हटलं आहे. जागतिक बाजारातील अस्थिरता, हवामान बदल यामुळे २०२५-२६ मध्ये ग्राहक किंमत निर्देशांक आधारित महागाई दर ४ टक्के राहील असा अंदाज बँकेनं व्यक्त केला आहे.

वर्तमान आर्थिक वर्षात सकल देशांतर्गत उत्पादन विकास दर साडेसहा टक्के असेल. कृषी आणि उत्पादन क्षेत्रात वाढ होईल मात्र सेवा क्षेत्रातली दोलायमान स्थिती कायम राहील असं बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी सांगितलं.

<u>पंतप्रधाननवकारमहामंत्र-</u>

हवामान बदल हे सध्याचं सर्वात मोठं संकट असून शाश्वत जीवनशैली हा त्यावरचा उपाय आहे. जैन समाज कित्येक शतकांपासून त्याचा अवलंब करत आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवकार महामंत्र दिनानिमित्त नवी दिल्लीत आयोजित कार्यक्रमात ते काल बोलत होते.

नवकार महामंत्र विकसित भारताच्या संकल्पनेशी निगडीत आहे असं सांगून पाणी बचत, वृक्षारोपण, स्वच्छता, स्वदेशी, देशांतर्गत पर्यटन, सेंद्रिय शेती, आरोग्यपूर्ण जीवनशैली, योग, खेळ आणि गरीबांची मदत असे नवसंकल्प करण्याचं आवाहन पंतप्रदान मोदी यांनी केलं.

या कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान मोदी यांच्यासह १०८ देशांतील नागरिकांनी नवकार महामंत्राचं पठण केलं.

<u>मुख्यमंत्री</u>

राज्यातल्या आरोग्य उपकेंद्र ते संदर्भ सेवा रुग्णालयांपर्यंत विविध आरोग्य संस्था बळकट करण्यासाठी विस्तृत प्रकल्प तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिले. हा प्रकल्प आशियाई विकास बँकेच्या सहकार्यानं ‘मिशन‘ म्हणून राबवण्यात यावा, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी केली.

आशियाई विकास बँकेच्या सहकार्यानं होणाऱ्या वैद्यकीय शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रकल्पांची आढावा बैठक मुंबईत काल झाली, त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. बैठकीला वैद्यकीय शिक्षण मंत्री

हसन मुश्रीफ, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

<u>साउंडबाइटकोकाटे</u>

इंट्रो-

कृषी विभागातील प्रयोगशील अधिकारी, निवृत्त अधिकारी, प्रयोगशील शेतकऱ्यांचं ज्ञान, विद्यापीठातील तसंच परदेशातून आलेलं ज्ञान, पिकांचं वाण हे सर्व लोकाभिमुख करण्यासाठी आगामी काळात प्रयत्न करण्यात येतील, असं कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी काल सांगितलं. पुण्यात आयोजित राज्यस्तरीय कृषी अधिकारी आणि कर्मचारी कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते काल बोलत होते.

शेतीमधल्या भांडवली गूंतवणूकीच्या आवश्यकतेबाबत बोलताना ते म्हणाले,

या कार्यक्रमाला कृषी राज्यमंत्री आशीष जैस्वाल यांच्यासह कृषी विभागातील वरीष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. .

<u>राज्यपाल-</u>

समाजात शांती आणि सौहार्दाचं वातावरण असल्याशिवाय विकसित राष्ट्राचं ध्येय गाठता येणार नाही. सर्वधर्म संवादामुळे परस्परांविषयी असलेले पूर्वग्रह दूर होण्यात आणि समाजातील दुही मिटण्यास मदत होईल, असं मत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केलं. महावीर जयंतीनिमित्त मुंबईत आयोजित ‘सर्वधर्मीय संवादाच्या माध्यमातून जागतिक शांतता आणि सौहार्द’ या परिसंवादात ते काल बोलत होते. बिहारचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान या परिसंवादात सहभागी झाले होते. जगातील विविधता नैसर्गिक आहे तशीच विचारा विचारातील मतभिन्नता स्वाभाविक आहे. या वैविध्याचा स्वीकार करा परंतु त्यासोबतच त्यामागील शाश्वत एकता शोधण्याचा प्रयत्न करा, असं आवाहन खान यांनी केलं.

<u>गुंतवणूकपरिषद</u>

रत्नागिरीत काल झालेल्या गुंतवणूक परिषदेत स्थानिक उद्योजकांनी जिल्ह्यात १ हजार ३७ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याबाबत सामंजस्य करार राज्य शासनाबरोबर केले. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी या गुंतवणूक परिषदेचं उद्घाटन करताना ही माहिती दिली. महिला बचत गटांनी पर्यटनासाठी काम करून स्वयंपूर्ण व्हावं, या उद्देशानं आतापर्यंत त्यांना चार पर्यटन वाहनं दिली असून, आणखी अशी १० वाहनं देणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

उमेद प्रकल्पांतर्गत चिपळूणचा अन्न आणि फळप्रक्रिया क्लस्टर, तसंच वस्त्रोद्योग क्लस्टर आणि दापोलीचा मत्स्यप्रक्रिया क्लस्टर या महिला बचत गटांच्या तीन औद्योगिक समूहांकरिता १५ लाख रुपयांचा निधी या वेळी वितरित करण्यात आला. या तीन औद्योगिक समूहांसोबत 10 कोटी रुपयांचे सामंजस्य करारही करण्यात आले. या परिषदेला बँकर्स, गुंतवणूकदार, उद्योजक मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

गाळमुक्तधरण

राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्य शासनानं गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार ही योजना कायमस्वरूपी राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेचा प्रचार करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये जलरथ फिरवले जाणार आहेत.

या योजनेअंतर्गत जलाशयांमधील गाळ काढण्याचं काम प्रशासनानं निवडलेल्या स्वयंसेवी संस्था किंवा ग्रामपंचायतींच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. हा गाळ शेतात टाकण्यासाठी शासनाकडून अल्प तसंच अत्यल्प भूधारक शेतकरी, विधवा, अपंग शेतकरी आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना अनुदान दिलं जाणार आहे. या उपक्रमासाठी आवश्यक यंत्रसामग्री आणि इंधनाचा खर्च शासन करणार असून संपूर्ण प्रक्रियेसाठी जिल्हा प्रशासनामार्फत निधी वितरित केला जाईल.

व्हॉइसकास्ट

इंट्रो – सिंधुदुर्ग जिल्ह्यात वेताळ बांबर्डे या गावानं सेवानिवृत्त शासकीय अधिकारी आणि सेवाभावी संस्थेच्या मदतीनं शेतीच्या पाण्याची टंचाई दूर केली आहे. गावातल्या या जलक्रांतीबाबतची माहिती जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

स्क्रिप्ट - शासकीय सेवेतून निवृत्त होऊन आपल्या गावी येऊन लोकसेवेचं व्रत जपणारे विनायक ठाकूर, भगीरथ प्रतिष्ठान आणि शेतकरी यांच्या संयुक्त प्रयत्नातून सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या वेताळ बंबार्डे गावात जलक्रांती झालीय. पाण्या अभावी जिथ उन्हाळ्यात शेती होत नव्हती त्याठिकाणी उन्हाळी शेतीचा मार्ग मोकळा झालाय. कुडाळ तालुक्यातलं वेताळ बांबर्डे हे शेतीप्रधान गाव. गावात बारमाही शेती होते. भात, शेंगदाणा, कडधान्ये ही प्रमुख पिके इथं घेतली जातात. पण गेल्या काही वर्षात या गावातल्या "नानेभाट" या वाडीत पाणीटंचाई जाणवू लागल्यान शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी कमी पडू लागल. त्यामुळे शेतीसाठी पाणीपुरवठा कसा करायचा हा प्रश्न येथील शेतकऱ्यांना पडला. त्यावेळी सेवानिवृत्त शासकीय अधिकारी विनायक ठाकूर त्यांच्या मदतीला धावले. ऐन हंगामात शेतीसाठी मुबलक पाणी नसल्यान लोकवर्गणी जमवून हातेरी नदीतल पाणी शेतीसाठी आणायच ठरलं. ४० हजार रुपये गोळा देखील झाले. त्यातून पाईपलाईन टाकण्यात आली. पण पंपासाठी पैसे कमी पडू लागले. त्याकुर यांनी भगीरथ प्रतिष्ठानचे डॉ. प्रसाद देवधरांकडे शब्द टाकला. त्यांनी तात्कळ हो म्हटलं आणि भगीरथ प्रतिष्ठान आणि आदये ट्रस्ट पुणे यांच्या पुढाकारानं पंपाचा प्रश्नसुटला. आता शेतीला ऐन पाणीटंचाईत सुद्धा मुबलक पाणी मिळणार आहे. शेतकऱ्यांनी नदीवर पंप बसवून पाईपलाईनद्वारे पाणी आणून इथली शेकडो एकर जमीन ओलीताखाली आणली आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी सिंधुदुर्गहून नीलेश जोशी

<u>पाणीटंचाई</u>

रत्नागिरी जिल्ह्यात पाणीटंचाईच्या झळा जाणवू लागल्या आहेत. रत्नागिरी शहरालगतच्या पाच गावांमधल्या २५ वाड्यांना टँकरनं पाणी पुरवावं लागत आहे. चिपळूण, राजापूर आणि मंडणगड तालुक्यातल्या काही गावांनीही टँकरची मागणी केली आहे. रत्नागिरी शहरात आता दर सोमवारी पाणीपुरवठा बंद राहणार आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या शीळ धरणातला पाणीसाठा १५ जूनपर्यंत पुरविण्याच्या दृष्टीनं पालिकेनं हे नियोजन केलं आहे.

<u>अमलीपदार्थकारवाई</u>

अंमली पदार्थ नियंत्रण शाखेच्या पथकानं काल लातूर जिल्ह्यात कोट्यवधी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त केले. चूर तालुक्यातील रोहिना गावात मुंबई आणि पुणे शाखेच्या धिकाऱ्यांनी ही कारवाई केली. या प्रकरणातील पाच आरोपींमध्ये एका पोलिस कर्मचाऱ्याचा समावेश आहे. आरोपींवर मुंबईत पुढील कारवाई केली जाईल असं जिल्हा पोलिस अधीक्षक सोमय मुंडे यांनी सांगितलं.

आयपीएल

**IPL T20 क्रिकेटमध्ये काल अहमदाबाद इथं गुजरात टायटन्सनं राजस्थान रॉयल्सचा 58 धावांनी पराभव केला. टायटन्सच्या 218 धावांचं आव्हान पेलताना रॉयल्स विसाव्या षटकापर्यंत सर्वबाद 159 धावा करु शकला.**

हवामान

राज्यात आज कोकण आणि मध्य महाराष्ट्रात हवामान कोरडं राहील. मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**